स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

शिक्षणशास्त्र विषयातील पी.एच.डी. पदवीसादी सादर करण्यात
येणाऱ्या संशोधनाची रुपरेषा

संशोधन विषय

जळगाव जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या
स्वसंकल्पना व व्यक्तीमत्त्व यांच्यातील सहसंबंधाचा अभ्यास.

संशोधक

वाघ सुधाकर शांताराम

मार्गदर्शक

प्रा.डॉ. एस.बी. सारंग
(एम.एस्सी., एम.एड., पी.एच.डी.)

वर्ष २०१८

अनुक्रमणिका

प्रकरण क्र.	प्रकरणाचे नाव
१	प्रस्तावना
१.१	शीर्षक
१.२	संशोधनाची गरज
१.३	संशोधनाची महत्त्व
१.४	समस्या विधान
१.५	संशोधनाची उद्दिष्टे
१.६	गृहीते
१.७	परिकल्पना
१.८	पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या
१.९	संशोधनाची व्याप्ती
१.१०	संशोधनाची मर्यादा
२	संबंधीत साहित्याचा व संशोधनाचा आढावा
२.१	संबंधीत साहित्याचा आढावा
२.२	संबंधीत संशोधनाचा आढावा
२.३	प्रस्तुत संशोधनाचे वेगळेपण
३	संशोधनाची कार्यपध्दती
३.१	संशोधनाची पध्दती
३.२	संशोधनाची कार्यवाही
३.३	जनसंख्या
३.४	न्यादर्श
३.५	संशोधनाची साधने
३.६	संख्याशास्त्रीय परिमाणे
४	माहितीचे संकलन विश्लेषण आणि अर्थनिर्वचन
	वेळापत्रक अंदाजपत्रक
	संदर्भसूची

प्रकरण १ ले

प्रस्तावना

१.१ प्रस्तावना -

कोठारी आयोग - १९६४. **उद्याचा भावी नागरीक आज वर्ग खोल्यामधुन घडत आहे.** ही छोटी मुले उद्या देशाची कुटूंबाची, राष्ट्रची नव्हे - नव्हे तर जगाची धूरा सांभाळणारे आहे. ते भावी नागरीक निकोप सुदृढ, सक्षम झाल्याशिवाय देश कसा निकोप होईल. एकीकडे अवकाशात झेप घेत आहोत तर दुसरी बाजू मात्र मन विषण्ण करणारी आहे. दारिद्र्य, अंधश्रध्दा, रुढी, परंपरा यांना चिटकून बसणारा समाज आहे. एकीकडे गर्भश्रीमंती, बौध्दीक संपन्नता, मानसीक, शारिरीक दृष्टीने सक्षम असतांना देखील भारत २१ व्या शतकात देखील विकसनशीलच आहे. कारण शिक्षणापासून वंचित असणाऱ्या घटकांची देखील संख्या कमी नाही. म्हणूनच भारतीय संविधानाने ८६ व्या घटनादुरुस्तीने ६ ते १४ वयोगटातील सर्व मुलामुलींना मोफत व सक्तीचे शिक्षण देणे ही शासन व समाजाची जबाबदारी आहे, म्हणून **सब पढे सब बढे** हे केंद्र व राज्यसरकार मिळून सर्व शिक्षा अभियानाचे घोषवाक्य स्वीकारले आहे. शिक्षणाचे सार्वत्रिकीकरणाचे उद्दीष्टे ठराविक काळात पूर्ण करण्यासाठी सर्व शिक्षा अभियानासारखे कार्यक्रम हाती घेतले आहे. ह्या कार्यक्रमांमधुन वंचीत व दुर्बल घटकांमधील मुलांना मुख्य प्रवाहात आणणे हा मुख्य उद्देश आहे. प्रत्येकास आपल्या गरजेनुसार शिक्षणाची संधी मिळणे हा प्रत्येक बालकाचा हक्क आहे, शिक्षणाच्या माध्यमातूनच व्यक्ती इतरांशी समायोजन साधत असते. त्यातूनच सामाजीक विकास होण्यास मदत होते. अनुवंश व परिस्थितीमुळे व्यक्तीमत्वावर परिणाम होतो, बालकाचा शारीरिक, मानसिक, बौध्दीक आणि परिणामी आर्थिक विकास खुंटतो, सामाजिक मानसीकता हा घटक देखील शिक्षणामध्ये अडसर निर्माण करतांना दिसून येतो. २१ व्या शतकाकडे वाटचाल करतांना विकासीत भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी, सुजलाम, सुफलाम देश घडविण्यासाठी देशातील प्रत्येक घटकाची भूमीका ही महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

म्हणूनच देशातील वंचित व दुर्बल घटकांमधील मुलांना शिक्षणाच्या मुख्यप्रवाहात आणण्यासाठी शासनाच्या विविध योजनापैकी आश्रमशाळा ही एक नाविण्यपूर्ण योजना अंमलात आलेली आहे. अन्न, वस्त्र, निवारा ह्या मुलभूत गरजा ह्या ठिकाणी पूर्ण होतात, त्याच बरोबर शिक्षणाचा प्रसार हा मुख्य उद्देश त्या ठिकाणी सफल होतांना दिसून येतो.

संशोधक बी.एड्. महाविद्यालयामध्ये गेल्या काही वर्षापासून अध्यापन कार्य करीत असतांना प्रशिक्षणार्थीसमवेत अनेक प्रात्यक्षिक कार्य पूर्ण करण्याच्या निमीत्ताने शाळांना भेटी दिल्या जातात. त्यातच आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या बाबतीत संशोधकाला मोठ्या प्रमाणात उत्सुक्ता दिसुन आली. त्यांच्या आवडी-निवडी, भाषा, श्रध्दा, रुढी परंपरा, अभ्यास सवयी यांच्यात मोठ्या प्रमाणात भिन्नता आढळुन आलेली दिसली. म्हणून संशोधकाने त्यांच्या व्यक्तीमत्वाचा अभ्यास करण्यासाठी त्यांच्या स्वसंकल्पना नेमक्या कशा आहेत, व त्याचा परिणाम व्यक्तीमत्त्वावर कसा होतो. याचा अभ्यास संशोधकाला करणे गरजेचे आहे.

मनुष्य हा समाजशील प्राणी आहे, तो समुहातील एक घटक म्हणून वावरत असतांना समाजाच्या त्याच्याकडून काही अपेक्षा असतात. त्या अपेक्षांच्या पूर्तीसाठी तो स्वतःबद्दल जागृक असतो, त्यानुसार त्याच्या वर्तनात बदल घडवून आणत असतो, याव्दारे तो स्वतःचे व्यक्तीमत्व घडविण्याचा प्रयत्न सातत्याने करतांना दिसून येतो. स्वसंकल्पनेचा उल्लेख सर्वप्रथम विलयम जेम्स यांनी सर्वप्रथम केला. व्यक्तीच्या भूमीकेत प्रवेश केल्याशिवाय इतरांना आपल्याविषयी काय वाटते, हे कळू शकणार नाही, याचा व्यक्तीच्या व्यक्तीमत्वाशी संबंध येतो म्हणजेच व्यक्तीची छाप होय. स्वसंकल्पनेतूनच व्यक्तीचे व्यक्तीमत्व घडत असते.

आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचा व्यक्तीमत्त्वाचा अभ्यास संशोधक करु इच्छितो, कारण त्यांच्या श्रध्दा, रुढी, परंपरा, भाषा यांची विविधता मोठ्या प्रमाणावर असल्याकारणाने त्यांच्या आवडी निवडी देखील भिन्नता मोठ्या प्रमाणावर दिसून येते. प्रत्येक व्यक्तीची आवड ही भिन्न असते, ही आवड स्वजाणीवेतूनच प्राप्त होत असते. व्यक्ती आपल्या आवडीनुसार विविध अशा प्रतिमा स्वतःमध्ये निर्माण करीत असतो, व्यक्ती निरीक्षणातून, अनुभवातून, त्याने केलेल्या विचारातून ह्या प्रतिमा तयार होत असतात. यांनाच स्वसंकल्पना (Self concept) असे म्हणतात. थोडक्यात स्वसंकल्पनेत व्यक्तीचे स्वतःविषयीचे विचार, भावना, आणि वर्तन यांचा सामावेश होतो.

सर्वसाधारणपणे समाजात वावरत असतांना प्रामुख्याने तीन प्रकारच्या व्यक्तीमत्वाच्या व्यक्ती भेटत असतात, काही अंर्तमुखी तर बर्हिमुखी किंवा क्वचीत प्रसंगी उभयमुखी स्वभावाचे असतात. अंर्तमुखी हे कमी बोलणारे, लाजाळू, मोठ्या प्रमाणावर माघार घेणारे शांत वृत्तीचे असतात, तर बर्हिमुखी हे समाजाभिमुख, उत्साही, बोलघेवडे चारचौघात मिसळणारे असतात. आश्रमशाळेतील विद्यार्थी हा देखील समाजात वावरणारा एक घटक

आहे, स्वाभाविकच त्याच्या व्यक्तीमत्वावर स्वसंकल्पनेचा व व्यक्तीमत्वाचा प्रभाव पडणे क्रमप्राप्त ठरते.

१.२ शीर्षक -

"जळगाव जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या स्वसंकल्पना व व्यक्तीमत्व यांच्यातील सहसंबंधाचा अभ्यास."

१.३ गरज -

१) आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची स्वसंकल्पना कशा प्रकारच्या असतात, हे समजण्यासाठी.

२) स्वसंकल्पना व व्यक्तीमत्व यांच्यातील परस्पर संबंध समजण्यास मदत होण्यासाठी.

३) आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या स्वसंकल्पनेत व व्यक्तीमत्व संकल्पनेत लिंगनिहाय, स्थळनिहाय फरक असतो का ? हे समजेल.

४) प्रत्येक विद्यार्थ्यांचा स्वत:विषयीचा दृष्टीकोन भिन्न-भिन्न असतो का ? समजण्यासाठी.

५) स्वसंकल्पनेचा स्तर समजण्यास मदत होत असल्यामुले त्यानुसार आपणास विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करता येईल.

म्हणून सदरचे संशोधन करणे गरजेचे आहे.

१.४ महत्त्व -

आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांमध्ये संशोधकाला निरीक्षणामधून व त्यांच्या सहवासातून मोठ्या प्रमाणावर भित्रेपणा, न्यूनगंड, आत्मविश्वासाचा अभाव दिसून आला. त्यामुळे संशोधकाने माध्यमिक आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचा त्यांचे स्वत:विषयी विचार, भावना, मते, आवड, निवड कशा असतील याचा अभ्यास करणे महत्त्वाचे वाटते. म्हणूनच स्वसंकल्पना व व्यक्तीमत्व याचा अभ्यास संशोधक करणार आहे.

१.५ समस्या विधान -

जळगाव जिल्ह्यातील माध्यमिक आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचा स्वसंकल्पना व व्यक्तीमत्त्व यांचा सहसंबंधाचा अभ्यास.

१.६ उद्दीष्टे -

संशोधन समस्या एक वा अनेक समस्या एकत्रीत होवून बनलेली असते, जी गरज संशोधकाला सतत अनुभवास येते, अशा प्रमुख समस्येतून पृथःकरणाने एक वा अनेक लहान प्रश्न निर्माण होतात. या विविध प्रश्नांना विधानात रुपांतरीत केल्याने संबंधीत संशोधनाची उद्दीष्टे तयार होतात.

प्रस्तुत संशोधनाची उद्दीष्टे खालीलप्रमाणे असतील.

१) माध्यमिक आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या स्वसंकल्पनेचा अभ्यास करणे.

२) माध्यमिक आश्रमशाळेतील विद्यार्थीनींचा स्वसंकल्पनेचा अभ्यास करणे.

३) माध्यमिक आश्रमशाळेतील विद्यार्थी व विद्यार्थीनींच्या व्यक्तीमत्वाचा अभ्यास करणे.

४) विद्यार्थ्यांची स्वसंकल्पना व व्यक्तीमत्व यांच्यातील सहसंबंधाचा शोध घेणे.

१.७ गृहीतके -

१) विद्यार्थ्यांमध्ये स्वसंकल्पना असते.

२) विद्यार्थीनींमध्ये स्वसंकल्पना असते.

३) व्यक्तीमत्व विकासासाठी स्वसंकल्पना आवश्यक असतात.

४) स्वसंकल्पनेमध्ये परिस्थितीनुसार बदल होतो.

५) आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वात भिन्नता आढळते.

१.८ परिकल्पना -

सांख्यिकीय परिकल्पना -

१) माध्यमिक आश्रमशाळेतील विद्यार्थी व विद्यार्थीनीमधील स्वसंकल्पनेत सार्थ फरक आढळून येत नाही.

२) माध्यमिक आश्रमशाळेतील विद्यार्थी व विद्यार्थीनीमधील व्यक्तीमत्वात सार्थ फरक आढळून येत नाही.

३) विद्यार्थी व विद्यार्थीनींच्या मध्यमान गुणांकात फरक आढळून येईल.

४) स्वसंकल्पना व व्यक्तीमत्वात सहसंबंध आढळून येतो.

१.९ शून्य परिकल्पना -

१) माध्यमिक आश्रमशाळेतील विद्यार्थी व विद्यार्थीनींच्या स्वसंकल्पनेचा व्यक्तीमत्वावर सार्थक परिणाम होणार नाही.

२) विद्यार्थी व विद्यार्थीनींच्या मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळणार नाही.

३) स्वसंकल्पना व व्यक्तीमत्वात सहसंबंधात्मक फरक आढळून येणार नाही.

१.१० संकल्पनात्मक व्याख्या -

१) जळगाव जिल्हा -

उत्तर महाराष्ट्रातील व नाशिक प्रशासकीय विभागातील एक सदन जिल्हा.

२) माध्यमिक -

प्राथमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर आणि उच्च शिक्षण पूर्ण करण्याअगोदर जे शिक्षण घेतले जाते, त्या शिक्षणाला माध्यमिक शिक्षण म्हणतात. आणि ते जेथे दिले जाते त्याला माध्यमिक शाळा असे म्हणतात. - डॉ. विनोद पाटील.

३) आश्रमशाळा -

अनुसूचीत जाती, गिरीजन, भटक्या जमाती व इतर आदिवासी यांच्या शैक्षणिक प्रगतीकरिता शासकीय अनुदानाने उघडलेली विद्यालये. - डॉ. गोविंद पानसरे

४) स्वसंकल्पना -

१) स्वतःची शरीर संपदा, वर्तन, क्षमता, समजूती, मूल्ये आणि व्यक्ती म्हणून स्वतःच केलेले मूल्यमापन या सर्वांचे संघटन म्हणजे स्व होय. - शरीफ

२) स्वःच्या व्यक्तीमत्वाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या आंतरीक आवस्थेस स्व संकल्पना म्हणतात - जॉन्सन.

५) व्यक्तीमत्व -

व्यक्तीमत्व म्हणजे सामाजिक परिस्थितीत घडणाऱ्या व्यक्तींच्या वर्तनाची गोळा बेरीज होय. - ए.ई. ट्रॅक्सलर.

६) अभ्यास -

स्वसंकल्पना व व्यक्तीमत्व यांच्यातील असलेला परस्पर संबंधाचा विचार म्हणजे अभ्यास.

कार्यात्मक व्याख्या -

१) जळगाव जिल्हा -

महाराष्ट्रातील एक सधन जिल्हा.

२) माध्यमिक -

शाळेतील इ. ५ वी ते १० वी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा गट.

३) आश्रमशाळा -

शासनाने काढलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी मोफत अन्न, वस्त्र, निवारा व शिक्षण इ. सेवा सुविधांची व्यवस्था म्हणजे आश्रमशाळा होय.

४) स्वसंकल्पना -

व्यक्तीचे स्वतःविषयी असणारे मत, त्याच्या समजुती या विषयी त्याची कल्पना म्हणजेच स्वसंकल्पना.

५) व्यक्तीमत्व -

विद्यार्थ्यांच्या भावविश्वातील गुण वैशिष्ठयांबाबत वर्तन व सृजानात्मक विश्वातील प्रकट क्षमता म्हणजे व्यक्तीमत्व.

६) अभ्यास -

स्वसंकल्पना व व्यक्तीमत्व यांच्यातील असलेला परस्पर संबंधांचा विचार म्हणजे अभ्यास.

व्याप्ती -

१) सदरचे संशोधन हे जळगाव जिल्ह्यातील माध्यमिक आश्रमशाळेतील विद्यार्थ्यापुरतेच व्यापक आहे.

२) सदरचे संशोधन हे स्व संकल्पना व व्यक्तीमत्व ह्या घटकापुरतेच मर्य़ादीत आहे.

३) जळगाव जिल्ह्यातील आश्रमशाळांपुरतेच व्यापक आहे.

मर्यादा -

१) सदरचे संशोधन हे जळगाव जिल्ह्यातील माध्यमिक आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांपुरतेच मर्य़ादीत आहे.

२) सदरचे संशोधन हे स्वसंकल्पना व व्यक्तीमत्व ह्या घटकापुरतेच व्यापक आहे.

३) जळगाव जिल्ह्यातील आश्रमशांपुरतेच मर्यादीत आहे.

४) सदरचे संशोधनाचा कालावधी सन २०१८-२०२० ह्या कालावधींपर्यतच मर्यादीत आहे.

प्रकरण २ रे

संबंधीत संशोधनाचा आढवा

२.१ -

१) DHADDA, D.K. (१९८५) - (Ph.D. साठी)

Self concept of teachers & their emotional Adjustment, Ph.D. (Edu.)

यांनी शिक्षकांच्या स्वसंकल्पना आणि त्याचे भावनीक समायोजन यांचा अभ्यास केला.

२) डॉ. कावेरी एम. डहाळे (Ph.D. २००४)

जालना जिल्ह्यातील माध्यमिक शाळेत घेतल्या जाणाऱ्या उपक्रमांचा विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्व विकासावर होणाऱ्या परिणामांचा चिकीत्सक अभ्यास.

३) Akbar Hussain (२००६)

Self concept of physically challenged, Adolescents, Journal of Indian Academy of Applied Psychology - Jan- २००६ Vol. - ३२

अपंगत्वाचा स्वसंकल्पनेचा विकासावर प्राधान्याने कुमारवयीन मुलांच्या संदर्भात केला.

४) Chetri Sita (२०१४)

Self concept & achievement motivation of Adolescents & their Relationship with Acudemic Achivment.

यांनी कुमारवयीन विद्यार्थ्यांच्या स्वसंकल्पना आणि संपादीत प्रेरणेचा अभ्यास हा शैक्षणिक संपादकीच्या संदर्भातून केला.

५) अंजली सुर्यवंशी (२०१५) Ph.D. साठी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठातील अध्यापक महाविद्यालयातील अध्ययनार्थ्यांच्या अंर्तमुखी व बर्हिमुखी व्यक्तीमत्व गुणांचा तुलनात्मक अभ्यास.

२.२ संशोधनाचे वेगळेपण -

स्वसंकल्पना व व्यक्तीमत्व यावर संशोधने झालेली आहेत, मात्र ती एकत्रीत नाहीत, त्यांच्यामध्ये विविधता दिसून येते. ही संशोधने अध्यापक विद्यालयातील विद्यार्थी, कुमारवयीन मुले, अपंगत्व असलेले विद्यार्थी, शिक्षक यांच्यावर झालेले आहे. मात्र समाजातील वंचीत घटकांवर अर्थातच आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांवर कोणीही केलेले नाही. हेच या संशोधनाचे वेगळेपण आहे.

२.३ संशोधनाची कार्यवाही -

समस्या निश्चिती

↓

आराखडा निर्मिती

↓

आराखडा सादरीकरण

↓

आराखडा अंतीम मंजुरी

↓

संबंधित साहित्याचा आढावा

↓

साधन निर्मिती

↓

जनसंख्या व नमुना निवड

↓

साधनांच्या सहाय्याने माहिती गोळा करणे

↓

माहितीचे संकलन

↓

माहितीचे अर्थनिर्वचन

↓

निष्कर्ष व शिफारशी

↓

अहवाल लेखन

↓

सादरीकर

प्रकरण ३ रे

संशोधनाची कार्यपध्दती

३.१ -

१) संशोधनाची पध्दती -

सदरच्या संशोधनात सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला जाणार आहे. स्वसंकल्पना व व्यक्तीमत्वाच्या चाचणींचा वापर करण्यात येऊन माहिती संकलीत करण्यात येईल.

२) जनसंख्या -

सदरचे संशोधन जळगाव जिल्ह्याशी संबंधीत असल्यामुळे जळगाव जिल्ह्यातील सर्व (९७) माध्यमिक आश्रमशाळेतील इ. १० वी ची विद्यार्थी संख्या ही जनसंख्या असणार आहे.

३) न्यादर्श -

न्यादर्श म्हणून जळगाव जिल्ह्यातील ९७ माध्यमिक आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचा (इ. १० वी) समावेश राहील. सदर संशोधनासाठी संशोधक यादृच्छिक नमुना निवड पध्दतीचा वापर करेल.

४) संशोधनाची साधने -

सदरच्या संशोधनात सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला जाणार असल्याने प्रश्नावलीच्या साह्याने माहितीचे संकलन केले जाईल. संशोधनाचे साधन प्रश्नावलीत असणार आहे. त्यासाठी स्वसंकल्पना व व्यक्तीमत्व चाचणीचा वापर करण्यात येईल.

५) संख्याशास्त्रीय परिमाणे -

सदर संशोधनासाठी संशोधक माहितीचे विश्लेषण, विवेचन व अर्थनिर्वचन कर्यासाठी संख्याशास्त्रीय तंत्राचा वापर करण्यात येईल. मध्यमान, मध्यगा, बहुलक, प्रमाणविचलन, सरासरी, सहसंबंध व शेकडेवारीचा वापर करण्यात येईल.

६)	संशोधन कार्यवाही -

सदरच्या संशोधनाचा आराखडा तयार केल्यानंतर मान्यता प्राप्त स्वसंकल्पना व व्यक्तीमत्व चाचणीचा प्रश्नावलीचा वापर करण्यात येईल. ही प्रश्नावली जळगाव जिल्ह्यातील न्यादर्श घेतलेल्या माध्यमिक विद्यालयांना प्रत्यक्ष भेटी देऊन घेतली जाईल. संकलीत माहितीवर सांख्यीकीय प्रक्रिया केली जाईल, व शेवटी अन्वयार्थ निष्कर्ष मांडण्यात येतील.

प्रकरण ४ थे

माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वाचन

माहितीचे संकलन झाल्यानंतर संशोधकाने माध्यमिक आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे स्वसंकल्पना व व्यक्तीमत्व यांचा चिकीत्सक अभ्यासाला अनुसरुन उद्दीष्टे मांडलेले आहेत, परिकल्पा व गृहीतके यांच्या पडताळणीसाठी संख्याशास्त्रीय परिमाणाच्या साह्याने विश्लेषण आणि अर्थनिर्वचन करण्यात येईल, व शेवटी निष्कर्ष मांडण्यात येतील.

वेळापत्रक

१)	समस्या निश्चिती	२ महिने
२)	संबंधीत साहित्याचा आढाव	२ महिने
३)	संशोधन आराखडा	२ महिने
४)	माहितीचे संकलन	६ महिने
५)	माहितीचे विश्लेषण	६ महिने
६)	माहितीचा अन्वयार्थ	३ महिने
७)	निष्कर्ष मांडणे	२ महिने
८)	सारांश	२ महिने
९)	बांधणी व छपाई	४ महिने
	एकूण	२ वर्षे ६ महिने

संदर्भ ग्रंथसूची -

१) पंडित ब.बी. (१९८९) - शिक्षणातील संशोधन अभिकल्प, नूतन प्रकाशन, पुणे.

२) भिंताडे वि.रा. (१९९८) - शैक्षणिक संशोधन, नूतन प्रकाशन, पुणे.

३) उमाठे वि.तु., मुळे रा.सं. - शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे, नूतनत प्रकाशन, पुणे.

४) घोरमोडे के.यु. व घोरमोडे डॉ. कला - शै. संशोधनाची मूलतत्वे, विद्या प्रकाशन, नागपूर.

५) तडसरे, तंबाके, पाटील, दरेकर (२००३) - सामाजिक मानसशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

६) पारसनीस डॉ. न.रा. - प्रगत शै. मानसशास्त्र, नित्यनूतन प्रकाशन, पुणे.

७) कुलकर्णी के.वि. (२००७) - शैक्षणिक मानसशास्ज्ञ, श्रीविद्या प्रकाशन, पुणे.

८) शेषतेकर बडवे डॉ. शारदा - विकासाचे व अध्ययनाचे मानसशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर.

९) Buch M.B. (Ed.) Survey of Research in Edu., New Delhi. NCERT.

१०) Shodganga, Inflibnet.ac.in (२००९-Nov)

संशोधक — **वाघ सुधाकर शांताराम**

मार्गदर्शक — **प्रा.डॉ.सौ. एस.बी. सारंग**